पर्यटन संचालनालय (DoT), महाराष्ट्र शासन

मुख्यालय : नरीमन भवन, 156/157, 15वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-2
दूरध्वनी क्र.91-22-69107600, 91-22-69107604
ई-मेल – connect.dot-mh@gov.in

पर्यटन संचालनालयात खालीलप्रमाणे अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने किंवा करार पध्दतीने (कंत्राटी) https://forms.gle/MasGdB14wjfBGWgj6 या वेबलिंक वर दिलेल्या अटी व शर्तीनुसार भरावयाची आहेत. इच्छुक उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती, शैक्षणिक अर्हता व पूर्वानुभवाच्या माहितीसह या ई- मेल: dothrd1@gmail.com वर दि.03/05/2023 ते 15/05/2023 या कालावधी दरम्यान अर्ज सादर करावेत.

अ.क्र.	प्रतिनियुक्तीने / सेवानिवृत्त अधिकारी कंत्राटी पदे	पद संख्या
1.	तांत्रिक सल्लागार व योजना कार्यान्वय अभियंता	01
2.	सहायक प्रकल्प सल्लागार	01
3.	अधिक्षक	01
4.	लघूलेखक (उच्चश्रेणी)	02
5.	लघूलेखक (निम्नश्रेणी)	06

अ.क्र.	11 महिन्यांकरीता कंत्राटी पद	पद संख्या
1.	माहिती तंत्रज्ञान अधिकारी	01

सही/-
संचालक,
पर्यटन संचालनालय, मुंबई.

Directorate of Tourism (DoT), Govt of Maharashtra

HO : Nariman Bhavan, 156/157, 15th Floor, Nariman Point, Mumbai-21
Phone No: 91-22-69107600, 91-22-69107604
Email: – connect.dot-mh@gov.in

The following posts in the Directorate of Tourism are to be filled on deputation or contract basis as per the terms and conditions given on the weblink https://forms.gle/MasGdB14wjfBGWgj6 , Interested candidates should submit their application along with their personal information, educational qualification and pervious experience details on Email ID: dothrd1@gmail.com between Dt.03/05/2023 to 15/05/2023.

Sr.no.	Retired Contractual / Deputation Officer Post	No. of Post
1.	Technical Consultant and Project Implementation Engineer	01
2.	Assistant Project Consultant	01
3.	Office Superintendent	01
4.	Stenographer (High Grade)	02
5.	Stenographer (Lower Grade)	06

Sr.no.	11 Month Contractual Post	No. of Post
1.	Information Technology Officer	01

Sign/-
Director,
Directorate of Tourism, Mumbai.

पर्यटन संचालनालय (DoT), महाराष्ट्र शासन

मुख्यालय : नरीमन भवन, 156/157, 15वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-21
दूरध्वनी क्र.91-22-69107600, 91-22-69107604
ई-मेल – connect.dot-mh@gov.in

क्र.प.सं./आस्थापना/सेवानिवृत्त नियुक्ती/प्र.क्र.80/2023/
दि.

जाहिरात

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016.

पर्यटन विभाग अंतर्गत कार्यरत असलेल्या पर्यटन संचालनालयात कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता, गतीमानता व प्रभावी करण्याच्या दृष्टीने पर्यटन विकास योजनेचा आढावा घेणे, कालानुरुप सदर योजनेच्या अंमलबजावणी करावयाच्या सुधारणा संदर्भात सल्ला देणे इत्यादी कामांकरीता सनियंत्रण कक्ष निर्माण करण्यात येत आहे. पर्यटन विकास योजनेच्या सनियंत्रण कक्षाकरीता "गट-अ" व "गट-ब" दर्जाच्या प्रत्येकी एक कक्षामध्ये प्रतिनियुक्तीने किंवा सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने 12 महिन्यांच्या कालावधीकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-271/प्र.क्र.100/12, दि.17.12.2016 नुसार करार पध्दतीने घ्यावयाची आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान अधिकारी 11 महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घ्यावयाची आहे. इच्छुक अधिकारी /कर्मचारी यांच्या सदर जाहिरातीच्या अनुषंगाने बायोडेटासह अर्ज सादर करावा.

अ. क्र.	सेवानिवृत्त अधिकारी यांचे पदनाम व कामाचे स्वरुप	सेवानिवृत्तीच्या वेळेचा ग्रेड-पे	अर्हता व अनुभव	वयोमर्यादा
1.	**पद: तांत्रिक सल्लागार व योजना कार्यान्वय अभियंता** 1.प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामाचे मुल्यमापन व नियंत्रण करणे. 2.प्रादेशिक विकास योजनेंतर्गत तिर्थक्षेत्रा संबंधित कामांचे मुल्यमापन करून स्पिलओव्हर मध्ये निधी वितरणाबाबत शासनास निर्णयाकरीता प्रस्ताव सादर करणे. 3.योजनेच्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांची छाननी करून प्रस्तावित करणे. 4.पर्यटन विकास योजनेचा प्रभावी अंमलबजावणीकरीता उपाययोजना व नियंत्रण करणे. 5.मा. संचालक यांनी तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली इतर कामे.	गट अ ग्रेड-पे 7600 किंवा अधिक	1.विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान 3 वर्षांचा मंत्रालयीन/ पर्यटन विभाग किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळमधील अनुभव आवश्यक. 2.पर्यटन विभाग /क्षेत्रामधील अनुभवास प्राधान्य. 3.सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावे. तसेच सदर सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी. 4.प्रतिनियुक्तीने.	वय 65 पेक्षा जास्त असू नये.
2.	**पद: सहायक प्रकल्प सल्लागार** 1.प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामांचे मूल्यमापन करणे. 2.प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत तीर्थक्षेत्रांशी संबंधित कामांचा आढावा घेणे. 3.पर्यटन विकास योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांची छाननी करणे. 4.योजनेच्या अंमलबजावणी संनियंत्रणाकरीता कार्यपध्दती निश्चित करणे व उपाययोजना करणे. 5. विधीमंडळ कामकाजाविषयीची सर्व कामे. 6.संचालनालयाच्या कर्मचारी सेवाविषयकाबाबत सल्ला देणे व शासनास प्रस्ताव सादर करणे.	गट ब ग्रेड-पे4600 किंवा अधिक		

3.	**पद: अधिक्षक** 1.आस्थापना व प्रशासन विभागाची सर्व कामे हाताळणे व नियंत्रण ठेवणे 2.अधिवेशन काळात आस्थापना व प्रशासन विषयक लक्षवेधी सूचना तारांकित /अतारांकित प्रश्न, माहितीचा अधिकारी व न्यायप्रविष्ठ प्रकरणे हाताळणे. 3.दैनंदिन टपाल वितरण करून कामकाजाचे वाटप करणे व नियंत्रण ठेवणे, संचालनालयाच्या वाहनांवार नियंत्रण ठेवणे. 4. अधिकारी/ कर्मचारी यांच्या उपस्थितीची नोंद घेणे, वाहनचालकांची लॉगबुक नियमितपणे तपासून उपस्थिती व वेतन इत्यादीबाबत कामे हाताळणे. 5.संचालनालयातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक बाबी हातळणे(वेतन, बदली, पदोन्नती, नेमणुका, शिस्तभंग इ.) व सेवापुस्तके अद्ययावत करणे. 6.ई-ऑफिस प्रणालीची सक्षमपणे अंमलबजावणी करणे	गट ब ग्रेड-पे4600 किंवा अधिक	1.विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान 3 वर्षांचा मंत्रालयीन/ पर्यटन विभाग किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळमधील अनुभव आवश्यक. 2.पर्यटन विभाग /क्षेत्रामधील अनुभवास प्राधान्य. 3.सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावे. तसेच सदर सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी. 4.प्रतिनियुक्तीने.	वय 65 पेक्षा जास्त असू नये.
4.	**पद: लघुलेखक (उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी)** 1.मा. संचालक यांचे श्रुतलेखनाचे कामकाज करणे. 2.वरिष्ठांच्या सहाय्याने मंत्रालयीन स्तरावरील शासनाकडून येणारा पत्रव्यवहार करणे. 3.मा. संचालक यांनी तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली इतर कामे.			

अ. क्र.	11 महिन्यांकरीता पदनाम व कामाचे स्वरुप	मासिक मानधन	अर्हता व अनुभव	वयोमर्यादा
1.	**पद: माहिती व तंत्रज्ञान अधिकारी** 1. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान व संगणकीय कामावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे 2. माहिती तंत्रज्ञान/ संगणक विषयक प्रकरणाचा पाठपुरावा करणे. 3. संकेतस्थळांचा/मोबाईल अॅपचा विकास व देखभाल करणे. 4. नियुक्त हार्डवेअर/नेटवर्क एजन्सीच्या इंजिनिअर कडून संगणकाविषयक सर्व कामे करणे. 5.मा. संचालक यांनी तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली इतर कामे.	52723/-	1.माहिती व तंत्रज्ञान विषयातील अभियांत्रिकी पदवी तथा पर्यटन विषयातील पदविका असल्यास प्राधान्य 2.माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित संस्थेमधील किमान 3 वर्षाचा अनुभव	18 ते 38 वर्षे पूर्ण (खुला वर्ग), मागासवर्गीय व्यक्तींसाठी 43 वर्षे पूर्ण.

सदर जाहिरात https://forms.gle/MasGdB14wjfBGWgj6 या वेबलिंकवर उपलब्ध आहे.
अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 15 मे, 2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत.

सही/-
संचालक,
पर्यटन संचालनालय, मुंबई.